पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/७/कावि/३४७/२०१०
दिनांक- ११/०३/२०१०

प्रति,
मा. .....................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक १७.३.२०१० रोजी आयोजित केलेबाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा बुधवार, दिनांक १७.३.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

प्रत:- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिति
कार्यपत्रिका क्रमांक- १६०

दिनांक- १७.३.२०१० वेळ- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा बुधवार, दिनांक १७.३.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

विषय क्रमांक- १) मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१०/०९/१० मधील अ.क्र.७ अन्वये, भुगयो अंतर्गत पिंपळे सौंदागर पंप हाऊस येथिल पंपींग मशिनरीची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.फ्लोमॅक इंजि.कार्पोरेशन (नि.र.रू.१९,८४,८९१/- [र.रू. एकोणीस लाख चौऱ्याऐंशी हजार आठशे एक्यान्नव] पेक्षा ९ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २) मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.३/०९/१० मधील अ.क्र.४ अन्वये, मनपाच्या ब प्रभागा अंतर्गातील विकसीत असणाऱ्या उद्यानातील दिव्यांची व विद्युत साहित्यांची दोन वर्षा करिता देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.स्टार इलेक्ट्रीकल सर्व्हिसेस (नि.र.रू.१६,९८,७७५/- [र.रू.सोळा लाख अठ्ठ्यान्नव हजार सातशे पंच्याहत्तर] पेक्षा २०.२९ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३) मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.३/०९/१० मधील अ.क्र.६ अन्वये, मनपाच्या क प्रभाग कार्यक्षेत्रातील सर्व उद्याना तील पंपाची दोन वर्षाकरिता देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.स्वरूप इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इंजि. (नि.र.रू. १४,९८,२७८/- [र.रू.चौदा लाख अठ्ठ्यान्नव हजार दोनशे अठ्ठ्याहत्तर] पेक्षा १६.९० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ४) मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.५५ अन्वये, वॉर्ड क्र.१९ मधील ठिकठिकाणचे रस्ते खडीमुरुम व बी.बी.एम.पध्दतीने दुरुस्त करणेकामी मे.एन.एन. शिंगाडे (नि.र.रू.३,७५,०००/- [र.रू.तीन लाख पंच्याहत्तर हजार] पेक्षा ४०.९ % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा

करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ५) कायदा विभागाकडील वाहनाची नुकसान भरपाई या लेखाशिर्षा वरून दावे खटले या संबंधी खर्च या लेखाशिर्षावर र.रू. ७,००,०००/- [र.रू.सात लाख] तरतूद वर्ग करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ६) श्री.सी.एन.लांडगे, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांनी दिनांक ९/११/९५ ते दिनांक ३०/४/२००७ या कालावधीत प्र.प्रशासन अधिकारी, करसंकलन या पदाचा अतिरिक्त पदभार सांभाळले बद्दल त्यांना उक्त कालावधी मधील संभाव्य वेतानाच्या १० % दराने परंतू दरमहा रू.५००/- एवढ्या कमाल मर्यादेपर्यंत अतिरिक्त वेतन / विशेष वेतन मंजूर करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ७) मनपाची ४ प्रभाग कार्यालये व १५ विभागीय करसंकलन कार्यालया करिता मे.रिलायंन्स वल्ड यांचेकडील वायरलेस ब्रॉडबॅन्ड पुरविणेस व होणाऱ्या एकत्रित र.रू.१,८५,२५०/- [र.रू.एक लाख पंच्याऐंशी हजार दोनशे पन्नास] चे खर्चास तसेच सदरची रक्कम आगावू अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ८) मनपाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांचे इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रे (fire extinguisher) साहित्य बसविणेबाबत ई-नि.क्र.२०/१-०९/१० अन्वये लघुत्तम निविदाकार मे.रेखा इंजिनिअरींग वर्क्स, चिंचवड यांचे अग्निशमन यंत्रे (fire extinguisher) साहित्याचे दर प्रति नग र.रू.१,३५७/- प्रमाणे ४१० नगाचे एकूण र.रू.५,५६,३७०/- रिफीलींग प्रति नग र.रू. २७०/- प्रमाणे १०० नगाचे एकूण र.रू.२७,०००/-, देखभाल दुरुस्ती प्रति नग र.रू.१७/- याप्रमाणे एकूण र.रू.६,११,२५०/- दर स्विकृत करून, करारनामा करून पुरविठा आदेश निर्गत केलेला असल्याने प्रस्तुतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ९) मनपाचे तालेरा रूग्णालयात रेडिओलॉजिस्ट या पदाची आवश्यकता व वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करून ही केवळ एकच अर्ज प्राप्त झालेमुळे डॉ.मल्होत्रा रितु सतिश यांना रेडिओलॉजिस्ट या मानधनाचे पदावर प्रतिमहा र.रू.१५,०००/- [र.रू.पंधरा हजार] एकत्रित मानधनावर प्रत्यक्ष रूजु दिनांका

पासून सहा महिने कालावधीसाठी नियुक्ती देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १०) मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.३/२००९-१० मधील अ.क्र.१ अन्वये, वॉर्ड क्र.९ बोऱ्हाडेवाडी व इतर ठिकाणी पाणीपुरवठा विषयक किरकोळ दुरुस्ती व देखभालीची कामे करणेकामी मे.श्री कॉन्ट्रॅक्टर (नि.र.रू.९,१९,५४५/- [र.रू.नऊ लाख एकोणीस हजार पाचशे पंचेचाळीस] पेक्षा ३०.३० % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ११) मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.३/२००९-१० मधील अ.क्र.२ अन्वये, वॉर्ड क्र.२१ धावडेवस्ती व इतर ठिकाणी पाणीपुरवठा विषयक किरकोळ दुरुस्ती व देखभालीची कामे करणेकामी मे.श्री कॉन्ट्रॅक्टर (नि.र.रू.९,३१,१६०/- [र.रू.नऊ लाख एकतीस हजार एकशे साठ] पेक्षा ३०.३० % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १२) मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.३/०९/१० मधील अ.क्र.३ अन्वये, मनपाच्या ब प्रभाग कार्यक्षेत्रातील सर्व उद्याना तील पंपाची २ वर्षाकरिता देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.स्वरूप इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इंजि. (नि.र.रू.१९,९६,९८४/- [र.रू.एकोणीस लाख शहान्नव हजार नऊशे चौऱ्याऐंशी] पेक्षा १६.६५ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १३) मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.३/०९/१० मधील अ.क्र.५ अन्वये, मनपाच्या ड प्रभाग कार्यक्षेत्रातील सर्व उद्याना तील पंपाची दोन वर्षाकरिता देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.ओमकार इंजिनिअरिंग (नि.र.रू.१४,९९,५४५/- [र.रू. चौदा लाख नव्यान्नव हजार पाचशे पंचेचाळीस] पेक्षा १६.९९ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १४) मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००८-०९ मधील अ.क्र.८७ अन्वये, भोसरी प्रभाग क्र.१९ गव्हाणेवस्ती व वॉर्ड क्र.२२ लांडेवाडी येथे एफ.आर.पी. वाचनालये बसविणे तसेच स्थापत्य विषयक इतर विविध कामे करणेकामी मे.एल.एम. तुलसानी (नि.र.रू.४,६३,९४६/- [र.रू.चार लाख

त्रेसष्ट हजार नऊशे शेहचाळीस] पेक्षा १९.३५ % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १५) मनपाचे श्री.अशोक सुरगुडे-विकास अभियंता (वि/यां) व श्री.दिलीप गावडे-सहा.आयुक्त (ब प्रभाग) हे दोन वरिष्ठ अधिकारी यांस लॅपटॉप करिता मे.रिलांन्स वेब स्टोअर लि. यांचेकडील वायरलेस ब्रॉडबॅन्ड पुरविणेस व होणाऱ्या एकत्रित र.रू.१८,८९८/- [र.रू.अठरा हजार आठशे अठ्ठ्यान्नव] चे खर्चास तसेच हायस्पीड युएसबी हार्डवेअर करिता र.रू.३,९९८/- [र.रू.तीन हजार नऊशे अठ्ठ्यान्नव] प्रथम अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १६) प्रभाग क्र.१७ बापदेवनगर मधील रस्ता रूंदीकरणातील मरावि विकंचे लघुदाब पोल व तारा हलविणे या कामाचे विज पर्यवेक्षण शुल्क र.रू.३१,३३५/- [र.रू.एकतीस हजार तीनशे पस्तीस] म.रा.वि.वि.कंपनीस अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १७) मुळा नदीचे महत्तम पुररेषा आखणी सर्वेक्षण ६० टक्के क्षेत्र येत असल्याने पिं.चिं.म.न.पा. हद्दीतील सर्वेक्षणाचा खर्च र.रू. ३१,७७,९७९/- व इंद्रायणी नदीचे पुररेषा आखणीचे खर्च र.रू. ३६,१६,०००/- असे एकूण र.रू. ६७,९३,९७९/- पैकी मनपाने अद्यापपर्यंत र.रू.५८,९२,०००/- इतका निधी पुणे पाटबंधारे विभागास अदा केलेला असल्याने उर्वरित निधी र.रू.९,०१,९७९/- कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे-१. यांना अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/७/कावि/३४७/२०१०
दिनांक : ११/३/२०१० चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.